आर. सी. सी. क्र. १८२/२०२४
नि. क्र. २३

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुरावा</u>**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव —हिराबाई लहानु जाधव,
वय — ४० वर्षे,
व्यवसाय — शेती,
राहणार — चेडगाव, ता. राहुरी, जि. अहमदनगर.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री एस. एस. गांधले यांच्यामार्फत सुरुः</u>**

**१.** आरोपी हे आमचे शेजारी राहात असल्याकारणाने मी त्यांना ओळखते. घटना कधी व काय घडली होती हे मला आठवत नाही. आमच्यामध्ये किरकोळ वाद झाले होते. असे काही घडले नाही की, मी, माझा मोठा मुलगा राहुल व दोन सुना से आम्ही आमचे राहते घरात असताना आरोपी क्र. १ ते ४ हे आमच्या घरात आले. असे काही घडले नाही की, आरोपींनी माझा मुलगा राहुल यास आमचे घरातील एका खोलीत कोंडून घेतले. असे काही घडले नाही की, आमच्या शेत जमीनीच्या सामाईक बांधाच्या वादावरून आरोपींनी आम्हाला शिवीगाळ करून मला व माझ्या सुना शितल व आश्वीनी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. असे काही घडले नाही की, आरोपी क्र. ३ संकेत व आरोपी क्र. ४ सागर यांनी आमच्या राहते घरावर दगड फेकले व म्हणाले की, तुम्ही जर आमचे नादी लागले तर तुम्हाला जिवे ठार मारून टाकु अशी धमकी दिली. असे काही घडले नाही की, आम्हाला मारहाण करीत असताना माझ्या सुनाच्या गळयातील पोत तुटुन नुकसान झाले. मी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावरील अंगठा माझा आहे. फिर्यादमधील मजकुर मला वाचून दाखविला नाही व सदरील मजकुर हा माझ्या सांगण्याप्रमाणे आणि बरोबर नाही. म्हणून, केवळ सहीस **निशाणी क्र. पी—१** देण्यात आला.

**(<u>साक्षीदार अभियोगपक्षास अनुकुल साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपासाच्या स्वरुपाची प्रश्न विचारण्याची अनुमती मागितली. परवानगी देण्यात आली).</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५/०९/२०२३ रोजी मी, माझा मोठा मुलगा राहुल व दोन सुना से आम्ही आमचे राहते घरात असताना आरोपी क्र. १ ते ४ हे आमच्या घरात आले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझा मुलगा राहुल

यास आमचे घरातील एका खोलीत कोंडून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या शेत जमीनीच्या सामाईक बांधाच्या वादावरून आरोपींनी आम्हाला शिवीगाळ करून मला व माझ्या सुना शितल व आश्वीनी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ संकेत व आरोपी क्र. ४ सागर यांनी आमच्या राहते घरावर दगड फेकले व म्हणाले की, तुम्ही जर आमचे नादी लागले तर तुम्हाला जिवे ठार मारून टाकु अशी धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला मारहाण करीत असताना माझ्या सुनाच्या गळयातील पोत तुटुन नुकसान झाले. आता मला माझ्या फिर्यादी जबाबातील **अधोरेखांकीत भाग अ** वाचुन दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. परंतु, तो माझ्या जबाबात का नमुद आहे, याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपीचे मिटले आहे व तसा तडजोडनामा नि. क्र. २२ वर दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. मला सदर प्रकरण चालवायचे नाही.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विदवान विधीज्ञ श्री. आर. डी. बाचकर यांचेमार्फत सुरूः–**

**उलटतपास नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृती,

ADITYA KRISHNA SHINDE
2025.11.29 17:24:45 +0530

**(आदित्य कृ. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. ३), राहुरी.

दिनांक – २९.११.२०२५